भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ● 2021 ● BG 433726

जोड पत्र -२, -दस्ताचा प्रकार/अनुच्छेद क्रमांक :

दस्त नोंदणी करणार आहे का? होय / नाही.

नोंदणी होणार असल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव : शिरुर/

मिळकतीचे वर्णन

मोबदला रक्कम

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता विद्याधाम प्राथमिक शाळा

दुसऱ्या पक्षकाराचे नाव

हस्ते असल्यास नाव व पत्ता

मुद्रांक शुल्क रक्कम 400

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक 9/9100

दि. 24 JAN 2022

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही.

मुद्रांक विक्रेत्याची सही
श्री.सुहास रामचंद्र येमुल
परवाना क्रमांक :-२२१२००१
(मुद्रांक विक्रेता, दस्तलेखनिक, शिरुर)
तहसिल कचेरी आवार. शिरुर

12 JAN 2022

उपकोषागार अधिकारी शिरुर

# भाडेकरारनामा

आज सोमवार दि.२४/०१/२०२२ रोजी ते दिवशी भाडेपट्टा करारनामा करुन ठेवतो ते ऐसाजे

मा. मुख्याधापिका ,
विदयाधाम प्राथमिक शाळा, शिरुर
ता.शिरुर जि.पुणे
सौ. ज्योती साहेबराव मुळे
वय :- ४५, वर्षे, धंदा : नोकरी
रा, शिरुर ता.शिरुर जि.पुणे

} लिहुन देणार

यांसी ...

मा. सचिव,

शिरुर शिक्षण प्रसारक मंडळ, शिरुर

ता.शिरुर जि.पुणे

श्री. नंदकुमार श्रीरंगराव निकम

वय :- ६८, वर्षे, धंदा : नोकरी

रा. शिरुर, शिरुर ता.शिरुर जि.पुणे

लिहून घेणार

**आम्ही लिहुन देणार व लिहुन घेणार कारणे करारनामा करुन ठेवतो की, तो खालीलप्रमाणे : –**

मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका शिरूर, जि. पुणे व मे. दुय्यम निबंधक सो शिरूर यांच्या कार्यक्षेत्रातील, गाव मौजे शिरुर येथील शिरुर नगरपालिका हददीतील, पुणे नगर रोड भागातील सि.स.नं-१९९३ मधील इमारतीतील २० खोल्या, सदर मिळकतीत असणा-या महिला व पुरुष शौचालयासहित.

येणे प्रमाणे मिळकत व त्यातील तदंगभुत वस्तु सहित व जाणेयेण्याच्या हक्कासहित दरोबस्त हा या करारनाम्याचा विषय आहे.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत लिहुन घेणार यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत भाड्याने देण्याचा हक्क व अधिकार लिहुन घेणार यांना आहे. त्यानुसार लिहुन घेणार यांनी वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही वार्षिक देण्याचे ठरवलेले आहे. सदर जागा लिहुन देणार यांनी विनंती केल्यामुळे त्यांना वर कलम १ मध्ये उल्लेख केलेली जागा वर्षाप्रमाणे भाडयाने देण्याचे ठरले आहे. त्याप्रमाणे (५ वर्षे) भाड्याने देण्याचे ठरवुन त्याप्रमाणे सदर कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : –

१) सदर २० खोल्या हया जुन २०२१ ते २०२६ पर्यंत भाडयाने दिलेली आहे. सदर खोल्यांचे वार्षीक भाडे हे रक्कम रु. ८,००,०००/– (अक्षरी आठ लाख रु. फक्त) इतके ठरले असुन ते लिहून देणार व लिहून घेणार यांना मान्य व कबुल आहे.

२) सदरच्या कराराप्रमाणे भाड्याचे वर्ष हे दरवर्षी ३१ मार्च पुर्वी देय असेल.

३) सदर जागेचा वापर केवळ लिहुन देणार यांनी फक्त शाळेसाठी व तदअनुशंगिक कामासाठी करावयाचा आहे.

४) लिहुन देणार यांनी जागा सुज्ञ भाडेकरुप्रमाणे वापरण्याची आहे. इतरांना कोणत्याही प्रकारे त्रास होईल असे वर्तन करण्याचे नाही.

५) जागेचा प्रत्यक्ष ताबा २०२१ रोजी पासुन लिहुन देणार यांच्या ताब्यात आहे.

६) काही कारणामुळे मुदतीपुर्वी करार तोडायचा असल्यास तीन महिने अगोदर तोंडी अथवा लेखी कल्पना देण्याचे ठरले आहे. तसेच लिहुन देणार यांना सदर जागा करारनाम्या आत तोडायचा असल्यास लिहुन देणार यांनी तशी १ महिने अगोदर तोंडी अथवा लेखी कल्पना देण्याचे ठरले आहे.

७) वर उल्लेख केलेल्या कोणत्याही अटींचा भंग केल्यास हा करार संपुष्टात आणण्याचा अधिकार लिहुन देणार यांस राहील.

८) सदर मिळकतीमध्ये लाईट कनेक्शन उपलब्ध असुन, येणारे लाईटबिल हे दरमहिन्याला लिहुन देणार यांनी भरायचे असुन त्याची कोणतीही तोशिष लिहुन घेणारास लागुन दयायची नाही. व तसेच सदर मिळकतीच्या संदर्भात असणारे सर्व शासकिय निमशासकिय कर लिहुन देणार यांनी भरावयाचे आहे.

९) संस्थेच्या मिळकतीत मैदान असुन संस्थेने उदात्त हेतुने विनामोबदला सदर मैदान शाळेस देवु केलेले आहे.

१०) सदर मिळकतीचा भाडेकरार वाढवयाचा ठरल्यास तो उभय पक्षाच्या संमतीने वाढवण्यात येईल.

११) हा करार राजी खुषीने लिहुन दिला असुन त्यातील अटी एकमेकांच्या विचाराने निश्चीत केल्या असुन त्यासाठी त्यांनी साक्षीदारासमक्ष त्यावर आज दि. २४/०१/२०२२ रोजी सह्या केल्या आहेत. वरील भाडेकरारास लिहुन देणार व लिहुन घेणार यांची पुर्ण मान्यता व संमती आहे.घोडनदी. दि. २४/०१/२०२२

लिहुन देणार



मुख्याध्यापिका
विद्याधाम प्राथमिक शाळा
शिरूर, जि पुणे - ४१२ २१०

साक्षीदार

सही

नाव

पत्ता

सही

नाव

पत्ता

लिहुन घेणार



सचिव
शिरूर शिक्षण प्रसारक मंडळ
घोडनदी, शिरूर, पुणे ४१२२१०

DILIP YASHAWANT WARE
B.A.,LL.B
ADVOCATE & NOTARY
"KRISHNA KUNJ" YASHWANT COLONY
SHIRUR (GHODNADI), TAL.SHIRUR
DIST. PUNE PH 9200435510

DILIP YASHAWANT WARE
NOTARY GOVT. OF MAHARASHTRA
PUNE DIST.

Noted And Registered
at Serial Number 613 / 2022
24 JAN 2022

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL